
**NEWSPAPER: SAAMANA**

**DATED: 25.08.2020**

# शिपाई ते चित्रकार!





डिलाईल रोडच्या मंगेश सावंत यांच्या थक्क करणाऱ्या कलाकृती

**कोरोनाच्या** संकटात कामाशिवाय घरी रिकामे बसून राहणे हा सर्वांसाठीच कठीण टास्क होता. आजूबाजूच्या नकारात्मक वातावरणाचा परिणामही कळत नकळत सर्वांच्या मनावर होत होता. परंतू या नकारात्मक वातावरणातही आपल्या आयुष्यात सकारात्मक्तेचे रंग भरण्याचे काम माटुंग्याच्या पोद्दार कॉलेजमधील शिपाई मंगेश सावंत यांनी केले आहे. कॅनव्हासवर त्यांनी रेखाटलेल्या देवदेवता आणि महापुरुषांच्या अप्रतिम कलाकृती सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत.

पोद्दार कॉलेजात शिपाई म्हणून काम करणाऱ्या मंगेश सावंत यांना लहापणापासूनच चित्रकलेची आवड. मनोहर गावडे यांच्याकडून चित्रकलेचे धडे घेतले. लॉकडाऊनमध्ये शाळा-कॉलेज बंद असल्याने त्यांनाही या काळात घरीच बसून राहावे लागले. सतत वाढणारी कोरोनाग्रस्तांची आकडेवारी सर्वांप्रमाणे त्यांचीही चिंता वाढवत होती. लॉकडाऊनमध्ये मिळालेल्या मोकळ्या वेळेचा सदुपयोग करत त्यांनी चित्रकलेची आवड जपली. रिकाम्या वेळेत पुन्हा रंगरेषांशी मैत्री करत त्यांनी कॅनव्हासवर छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, स्वामी समर्थ आदी देवदेवतांच्या आणि महापुरुषांच्या अप्रतिम कलाकृती आपल्या कुंचल्यातून साकारल्या आहेत.

## कलेने दिला आधार!

**कलेची आवड मला लहानपणापासूनच. एरव्हीदेखील वेळ मिळेल तेव्हा मी पोट्रेट, ऑईल पेटिंग करायचो. आमच्या प्रिन्सिपल मॅडम शोभना वासुदेवन यांनीही वेळोवेळी मला प्रोत्साहन दिले. कोरोनामुळे आजूबाजूला पसरलेल्या नकारात्मक वातावरणात मानसिक तणाव दूर करून सकारात्मक राहण्यासाठी मला चित्रकलेने मोलाची साथ दिली. भविष्यात चित्रप्रदर्शन भरवण्याची इच्छाही सावंत यांनी व्यक्त केली.**

